॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC PLANNING & DEVELOPMENT SECTION

Fax: (02462) 215572
Phone: (02462)215542

Website: srtmun.ac.in
E-mail: apds@srtmun.ac

अधिछात्रवृत्तीधारक (Fellowship)
विद्यार्थ्यासाठी मार्गदर्शक तत्वे.

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे संशोधन केंद्रप्रमुख, संशोधक मार्गदर्शक व अधिछात्रवृत्तीधाक (Fellowship) विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, विविध संस्थांमार्फत पात्र विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती दिली जाते अशा विद्यार्थ्यांनी आपले प्रोग्रेस रिपोर्ट, कन्टीन्युएशन, तिमाही अहवाल व तत्संबधीत कागदपत्रे या कार्यालयात स्वाक्षरीसाठी सादर करताना खालील बाबींची पुर्तता करून अंतिम दिनांकाच्या किमान १० दिवस अगोदर सादर करावीत जेणेकरून सर्व कागदपत्रांची छाननी करून कमी असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करणे सोईचे होईल.

०१. प्रोग्रेस रिपोर्ट, कन्टीन्युएशन व सहामाही अहवालावर मा.संशोधन केंद्रप्रमुख, संशोधक मार्गदर्शक यांच्या स्वाक्षरी तपासून कागदपत्रांवर सर्व माहिती व तारखा बिनचुक लिहाव्यात.

०२. नियमावली प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षात ०८ किरकोळ रजा व २२ क्षेत्रभेटीसाठी कार्यरजा देण्यात येतील. किरकोळ रजा व क्षेत्रभेटीच्या रजांकरीता संशोधक मार्गदर्शकांची शिफारस व मा.संशोधन केंद्रप्रमखांची मान्यता घेवून मान्यतेचा अर्ज प्रस्तावांसोबत जोडावा.

०३. ज्या ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी पुर्वपरवानगीने गेले तेथील संबधित अधिकारी/लोकसेवक यांचे **उपस्थिती प्रमाणपत्र किंवा जीओ टॅग फोटोप्रत** प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय कार्यरजा/उपस्थितीची गणना करता येणार नाही.

०४. यापुर्वी मिळालेल्या फेलोशिपचे बँक स्टेटमेंट जोडावे.

०५. दररोज ०८ तास संशोधन केंद्रावर संशोधन कार्यासाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. किमान ०६ तास बायोमेट्रीक उपस्थिती शिवाय पुर्णवेळ उपस्थिती ग्राहय धरता येणार नाही.

०६. क्षेत्रभेटीसाठी एकुण २२ कार्यरजा मंजूर आहेत. परंतू क्षेत्रभेटीसाठी २२ दिवसांपेक्षा जास्तीचे दिवस आवश्यक असतील तर संशोधक मार्गदर्शकांच्या शिफारशीने मा.संशोधन केंद्रप्रमुखांची पुर्वपरवानगी (मान्यता) घेणे अनिवार्य आहे.

०७. महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे मातृत्व/पितृत्व रजा मा.संचालक, संशोधन केंद्रप्रमुखांनी मान्यता दिल्याचे कार्यालयीन आदेश सादर करणे आवश्यक आहे.

०८. मातृत्व/पितृत्व रजेच्या व्यतिरिक्त वैद्यकिय रजा ही किरकोळ रजा समजण्यात येईल.

०९. प्रस्तावा सोबत विहीत नमुन्यातील चेकलिस्ट विद्यार्थ्यांनी तपासून सादर केल्याशिवाय प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

१०. उपयोगीता (Utilization Certificate) प्रमाणपत्र तयार करतेवेळस सदर प्रमाणपत्र एकाच पानावर (पुढे व मागे ) प्रिंट करावे.

११. मा.केंद्रसंचालकांच्या पुर्वपरवानगीने मार्गदर्शकांकडे संशोधनकार्या साठी उपस्थित राहील्यास तेथील बायोमेट्रीक उपस्थिती सादर करावी.

प्रस्ताव तयार करतेवेळेस संशोधक मार्गदर्शक व विद्यार्थीनी वरील मार्गदर्शक तत्वांचे काळजीपुर्वक पालन केल्यास अधिछात्रवृत्ती प्रस्ताव प्रमाणित करण्यास विलंब होणार नाही. प्रस्तावात कांही त्रूटी राहील्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र.: शैनिविवि/फेलोशिप/२०२५–२६/ 89

दिनांक: २० ऑगष्ट, २०२५

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :

०१. मा.कुलसचिव महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

०२. मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ व उपपरिसर, लातूर. आपल्या संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थी (अधिछात्रवृत्तीधारक) यांचे निदर्शनास आणावे व सूचना फलकावर लावावे.

०३. मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तूत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकांचे निदर्शनास आणावे.

०४. सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तूत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर APDS लिंकवर प्रकाशित करावे.

c:\users\lenovo\desktop\fellowship attendance & enquiry report 2025\circular.docx

## अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी फेलोशिप प्रस्तावासोबत सादर करावयाची चेकलिस्ट.

फेलाशिपधारक विद्यार्थ्यांचे नांव :--------------------------------------------------------------

संशोधनाचा विषय :------------------------- नोंदणी दिनांक :-------------------------------

मार्गदर्शकांचे नांव व पत्ता (मोबाईल नंबरसह) :--------------------------------------------

फाईल दाखल केलेला दिनांक : / /२०२

| अ.क्र. | विवरण | प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे जोडले बाबत √ करावी. |
|---|---|---|
| ०१ | संबधित वित्तीय संस्थेच्या नियमानुसार कालावधीसह प्रोग्रेस रिपोर्ट कन्टीन्युएशन व सहामाही अहवालावर मा.संशोधन केंद्रप्रमुख, संशोधक मार्गदर्शक यांच्या स्वाक्षरीसह जोडले आहे. | |
| ०२ | किरकोळ रजा मा.संशोधन केंद्रप्रमुख, संशोधक मार्गदर्शक यांच्या स्वाक्षरीसह जोडले आहे. | |
| ०३ | क्षेत्रभेटीच्या रजांकरीता संशोधक मार्गदर्शकांची शिफारस व मा.संशोधन केंद्रप्रमखांची मान्यता घेवून मान्यता प्रत जोडली आहे. | |
| ०४ | क्षेत्रभेटीसाठी पुर्वपरवानगी गेले तेथील संबधित अधिकारी/लोकसेवक यांचे उपस्थिती प्रमाणपत्र किंवा जीओ टॅग फोटोप्रत प्रस्तावासोबत जोडली आहे. | |
| ०५ | क्षेत्रभेटीसाठी २२ दिवसांपेक्षा जास्तीचे दिवस आवश्यक असतील तर संशोधक मार्गदर्शकांच्या शिफारशीने मा.संशोधन केंद्रप्रमुखांची पुर्वपरवानगी पत्र जोडली आहे. | |
| ०६ | दररोज ०८ तास संशोधन केंद्रावर संशोधन कार्यासाठी उपस्थित असले बाबत बायोमेट्रीक उपस्थिती अहवाल सोबत जोडला आहे. | |
| ०७ | महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे मातृत्व/पितृत्व रजा मा.संचालक, संशोधन केंद्रप्रमुखांनी मान्यता दिल्याचे कार्यालयीन आदेश सोबत जोडले आहेत. | |
| ०८ | प्रोग्रेस रिपोर्ट, कन्टीन्युएशन व सहामाही अहवालावर मा.संशोधन केंद्रप्रमुख, संशोधक मार्गदर्शक यांच्या स्वाक्षरी तपासून वरील कागदपत्रांवर सर्व माहिती व तारखा बिनचुक असल्याचे खात्री केले आहे. | |
| ०९ | प्रस्तावातील तारखा व इतर माहिती तसेच उपयोगीता (Utilization Certificate) प्रमाणपत्रावरील दर्शविलेल्या तारखां बाबत संबधित संस्थेकडुन त्रुटी आल्यास मी स्वत: जबाबदार राहीन. | |
| १० | मी सद्यस्थितीत कोणत्याही शासकिय अथवा निमशासकिय संस्थेत कार्यरत नाही तसे आढळून आल्यास माझेवर होणा–या कायदेशिर कार्यवाहीस मी स्वत: जबाबदार राहील. यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. | |
| ११ | फाईल ज्या विद्यार्थ्याची आहे त्यांनाच मिळेल इतरांना मिळणार नाही याची मला जाणिव आहे. | |

फाईल परत मिळालेला दिनांक :

फेलोशिपधारकाची सही